**प्राथमिक शिक्षण विभाग** **जिल्हा परिषद सांगली**
दुरध्वनी क्रमांक - 0233-2372717 ई मेल - eoprisang@gmail.com

वाचले-1. मा.आवर सचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील No.NOC-२००९(११२/०९) SE-१ दिनांक-०५/०६/२००९
2.मा.आवर सचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रं.नाहप्र 2013/(75)/13) माशी -01 दिनांक-02 ऑगष्ट 2013
3.या कार्यालयाचे मंजुर टिप्पणी दिनांक- / /२०२०

**********************************************************************************************

जा.क्रं.जिपसा/प्राशिवि/आस्था-१०/४९२५/२०२० दिनांक-१४/०७/२०२०

**सुधारित प्रथम मान्यता आदेश :-**

वरील वाचले क्रमांक १ ते ३ अन्वये पोदार एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेने पोदार इंटरनॅशनल स्कुल सांगली शाळा सुरु केले बाबतचा प्रस्ताव सादर केले असून, सदर प्राप्त प्रस्तावानुसार पोदार इंटरनॅशनल स्कुल सांगली या शाळेस इ.१ ली ते इ ८ वी करिता खालील अटी व शर्तीस अधिन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१.शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.शासनाने ज्या ठिकाणांसाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजणेत येईल.

३.शासन परवानगी आदेशामध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे.त्या वर्गाव्यतिरीक्त इतर वर्ग सरु करता येणार नाहीत.

४.परवानगी मिळाल्यापासून १८ महिन्याच्या आत व्यावस्थापनाने शाळा सुरु केलेली नाही,असे निदर्शनास आल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

५.महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत

मान्यता दिलेल्या शाळांचे अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

६.नविन / दर्जावाढ शाळामध्ये शासन निर्णय दिनांक-२९/६/२०१३ नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील.या शाळेच्या संदर्भात आर.टी.ई ॲक्ट २००९ मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

७.शाळेमध्ये आकारणेत येणारे शैक्षणिक शुल्क प्रचलित नियम तसेच वेळोवेळी होणाऱ्या सुधारीत नियमानूसार आकारणेत यावे.तथापी सदरचे शैक्षणिक शुल्क अवाजवी असू नये.नियमबाह्य शुल्क आकारणी केलेस योग्य ती कारवाई करणेत येईल.

८.शाळेची इमारत व परिसर शिक्षणानकुल स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

९.अधिनियमातील तरतुदीनुसार संस्था वरील वर्ग कायम विनाअनुदान तत्वार चालविण्यास कायमपणे सक्षम असली पाहिजे या वर्गाना कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी दिली असलेने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देणेत येणार नाही.

१०.शासन निर्णय दिनांक-३/११/२००९ नुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डिंग कोडनुसार असणे आवश्यक आहे.

११.सदरची प्रथम मान्यता आपण सादर केलेल्या कागपत्रांच्या आधारे देण्यात येत असुन,भविष्यात सदर कागदपत्रे खोटी अथवा चुकीचे आढल्यास आपली प्रथम मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१२.शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहुन नेमला पाहीजे तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधिकाऱ्याकडुन मान्यता घेतली पाहीजे.तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहीजे.

१३.मा.शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचे परवानगी आदेशातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता होण्याच्या अधिन राहून प्रथम मान्यता देणेत येत आहे.

(सुनंदा वाखारे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सांगली

<u>प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी</u>

1. अध्यक्ष / सचिव, पोदार एज्युकेशन ट्रस्ट
2. मुख्याध्यापक, पोदार इंटरनॅशनल स्कुल सांगली